**शासकीय अनुदानातून,जिल्हापरिषदेच्या जिल्हा निधीतून व जिल्हापरिषदेच्या घसारा निधीतून खरेदी केलेली वाहने निर्लेखित करुन नवीन वाहने खरेदीबाबत-**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्रमांक-जेईपी-1099/प्र.क्र.128/99/05
मंत्रालय,मुंबई-400 032
दिनांक- 09 जुलै,1999

## शासन निर्णय-

जिल्हापरिषदेच्या खालील पदाधिकारी व अधिकारी आणि पंचायत समिती यांना शासकीय अनुदानातून व जिल्हापरिषदेच्या जिल्हा निधी व जिल्हा घसारा निधीमधून वाहने खरेदी करण्यास शासनातर्फे मान्यता दिली जाते:-

1. अध्यक्ष,जिल्हापरिषद,
2. उपाध्यक्ष,जिल्हापरिषद
3. सर्व विषय समित्यांचे सभापती
4. जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
5. जिल्हापरिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी
6. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
7. पंचायत समिती

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना विकास कामासाठी त्वरित वाहने उपलब्ध व्हावीत यासाठी वाहने निर्लेखनाचे व मंजूरीचे प्रस्ताव विभागीय पातळीवर संबंधित विभागीय आयुक्तांनी शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे तपासून निर्णय घेतल्यास वाहने तात्काळ उपलब्ध होऊ शकतील म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, यापुढे वर नमूद केलेल्या पदाधिकारी/अधिका-यांसाठी तसेच पंचायत समितीकडील वाहने निर्लेखित करुन नवीन वाहने मंजूर करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांकडे राहतील.

विभागीय आयुक्तांनी शासनाने ठरवून दिलेले निकष तसेच शासनाच्या वित्त विभागामार्फत तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभागामार्फत वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश विचारात घेऊन त्यांच्या पातळीवर जिल्हापरिषदा व पंचायत समितीकडील जुनी वाहने निर्लेखित करुन नवीन वाहने खरेदी करण्यास परवानगी द्यावी. त्याचप्रमाणे वाहनाच्या देखभाल व दुरुस्तीवर शासनाने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त झालेल्या खर्चासुध्दा निकषानुसार व गुणवत्तेनुसार तपासून मंजूरी देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना राहतील. विभागीय आयुक्तांनी हे अधिकार अन्य अधिकाऱ्यांना प्रदान करु नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( रा. का. पवार )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व कार्यासने

osdesk 22.18

जिल्हा परिषद, नंदुरबार
सामान्य प्रशासन विभाग
8 OCT 2002
शाखाधिकारी
उप मु.का.अ.

जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांना स्वनिधीतून / घसारा निधीतून नवीन वाहन खरेदी करण्यास परवानगी देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक : जेईपी १०/ प्र.क्र.२२९/२००२/पंरा-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २००२.

वाचाः- शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
क्रमांक जेईपी १०९९/प्र.क्र.१४६/पंरा-१, दिनांक २६ ऑगस्ट, २००२

**प्रस्तावना :**

जिल्हा परिषदांच्या निवडणूका फेब्रुवारी २००२ मध्ये झाल्या आहेत व नवीन पदाधिकारी कार्यरत झाले आहेत. त्याचप्रमाणे शासनाने नवीन निर्माण केलेल्या तालुक्यातही पंचायत समित्या गठित झालेल्या आहेत. तथापि, जिल्हा परिषदांना विविध कारणांमुळे (उदा. वाहने जुनी होणे, नादुरुस्त होणे, वाहने निर्लेखित केली असणे) वाहने जिल्हा परिषदांना/पंचायत समित्यांना उपलब्ध नाहीत असे जिल्हा परिषदांनी शासनाला कळविले आहे. पदाधिकाऱ्यांना आपापल्या कार्यक्षेत्रातील विकास कामांची पाहणी करण्याकरिता वाहने देय आहेत. त्यांना ती उपलब्ध व्हावीत म्हणून हे पदाधिकारी शासनाकडे वारंवार संपर्क साधत आहेत. पंचायत समितीच्या सभापतींना वाहने उपलब्ध करुन देण्याची महाराष्ट्र विधानमंडळाच्या विभाग संलग्न समितीने ग्राम विकास व जलसंधारण विभाग अर्थसंकल्पीय मागण्या (२००२-२००३) च्या पहिल्या अहवालात आग्रहाची शिफारस केली आहे. जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनाही वाहन उपलब्ध नाही. उपरोक्त सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून/घसारा निधीतून नवीन वाहने खरेदी करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या पदाधिका-यांना/अधिका-यांना आपआपल्या कार्यक्षेत्रातील कामांचे निरिक्षण करण्यासाठी सुस्थितीतील वाहने उपलब्ध नसल्याची बाब

(३)

जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांनी शासनाच्या निर्देशनास आणली आहे. जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांना / अधिका-यांना सुस्थितीतील वाहने उपलब्ध होणे पंचायत राज संस्थांचे कार्य सुरळितपणे चालू राहण्यासाठी आवश्यक असल्यामुळे जिल्हा परिषदांना त्यांच्या स्वनिधीतून/घसारा निधीतून नवीन वाहने खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, अशी वाहने जिल्हा परिषदांनी आवश्यक तो ठराव करुन तसेच विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी करणे आवश्यक आहे.

२. नवीन वाहने ज्या प्रमाणात उपलब्ध होतील त्या प्रमाणात भाड्याने घेतलेली वाहने परत करण्यात येऊन भाडे करार रद्द करण्यात यावा.

३. याबाबत असेही स्पष्ट करण्यांत येते की, वाहनांवरील इंधन वापराची वार्षिक मर्यादा ठरलेली असल्याने ठरलेल्या मर्यादेतच खर्च मर्यादित ठेवण्याची दक्षता सर्व संबंधित जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी घ्यावी.

४. नवीन वाहन खरेदीसाठी शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही तसेच वाहन चालकाचे पदही निर्माण करण्यात येणार नाही.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( एस. शहजाद हुसैन )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष .
सर्व विभागीय आयुक्त.
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
वित्त विभाग (व्यय-१५ व विनियम) मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
निवड नस्ती (कार्या. पं.रा १)

A:\cr-186-revise

जिल्हा परिषद, नंदुरबार.
सामान्य प्रशासन विभाग.
१३ मे १९९९
शाखाधिकारी
उप मु.का.अ. मु.का.अ.

जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांच्या अंतर्गत लेखापरिक्षणासाठी निर्माण केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षक वर्ग-१ [कनिष्ठ] या पदाच्या जबाबदा-या विचारात घेता त्यांना एक जीप उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
परिपत्रक क्र. लेखाअ/१०९७/प्र. ११६०/३३.
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - ५ मे, १९९९.

परिपत्रक :-

शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्र. लेखाअ १०९७/प्र. ११६०/३३, दि. १६. २. ९७ नुसार अंतर्गत लेखापरिक्षक वर्ग-१ [ कनिष्ठ ] या पदाच्या जबाबदा-या निश्चित केल्या असून त्या जबाबदा-या परिणामकारकरितीने पार पाडण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी उपलब्ध असलेल्या वाहनातून एक वाहन [जिल्हा परिषद ] सदर अंतर्गत लेखापरिक्षण पथकास उपलब्ध करुन देण्याबाबत शासन निर्देश देत आहे.

अंतर्गत पथकाचे काम परिणामकारक व योग्य रितीने होण्यासाठी व गंभीर स्वरुपाच्या वित्तीय अनियमितता, भांडाराची पडताळणी करण्यासाठी ज्या धर्तीवर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना एक कार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली आहे त्याच धर्तीवर एक वाहन [ जिल्हा परिषद ] सदर पथकास देणे आवश्यक ठरते असून त्यांची अंमलबजावणी त्वरित व्हावी व वाहनासाठी इंधन वाहकाचे वेतन, वाहन दुरुस्ती व तत्सम खर्च जिल्हा परिषदेने त्यांच्या स्वउत्पन्नातून भागवावा.

[ एन. ओ. नरवाडे ]
वरिष्ठ लेखाअधिकारी.

प्रत योग्य कार्यवाहीसाठी.

१] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२] सर्व जिल्हा परिषदांचे अंतर्गत लेखापरिक्षक वर्ग १[कनिष्ठ
३] मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन मुंबई.
४] सर्व विभागीय उपलेखापरिक्षक [ वरिष्ठ ]
५] जिल्ह्याचे सर्व उपमुख्य लेखापरिक्षक स्थानिक निधी लेखा
६] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
७] सर्व कोषागार अधिकारी.